ISSN: 2394 5303 | Printing Area International Research journal | March 2019 Issue-51, Vol-02

03

अंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

March 2019, Issue-51, Vol-02

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghadke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra)
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) Impact of I-commerce in India
Dr. Kotgire Manisha, Dist. Aurangabad ||61

15) Gandhian writing
Dr. Rashmi Nagwanshi ||64

16) Sexual Harassment of women at the work place
Mr. Sunil Kumar Sharma, Bilasipara, Dhubri (Assam) ||65

17) Impact of the Indian Culture on South-East Asia
Dr. Md. Shamsuddin Mallick, University of Calcutta ||69

18) केळी उत्पादन आणि विपणनात मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर
जनार्दन जानजी देवरे, जळगाव ||76

19) हुंडा पध्दतीबाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनींचा दृष्टिकोन
डॉ. ज्योती शेषराव दिघाडे, अमरावती ||78

20) राम जोशी यांची लौकिक शृंगारिक लावणी
प्रा. जाधव दिलीप रामचंद्रराव, जि. नांदेड ||84

21) भारतातील भुमीहीन मजुरांच्या समस्या व उपाय
प्रा. डॉ. बी. आर. शिंदे, जि. परभणी ||86

22) मराठी बालकवितेचे स्वरूप अंतरंग
प्रा. गजानन आनंता देवकर, जि. नांदेड ||89

23) दहशतवाद : एक सामाजिक समस्या
प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास, जि. बीड ||92

24) पंचायतो में महिलाओं की राजनैतिक भूमिका
अनुताष कुमार, बादलपुर ||96

25) भारतीय कृषि : उपलब्धियाँ और नए उपाय
डॉ. शेखर मैदमवार, उज्जैन (म.प्र.) ||99

26) देवेंद्र आर्य की कविता में जीवन मूल्यों का दायित्व बोध
डॉ. अर्जुन के. तडवी, पाटण ||105

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth

सगळी धन संपत्ती सुद्धा
झालेली नायिका दिसते.
विचार करता. त्यातील
ची वाटतात. दासबोधात
वताड म्हटले आहे. याचे
शिवाय राहत नाही.

मयाचा इतिहास
ाङ्मय
मराठी वाङ्मयाचा इतिहास
राठी वाङ्मयाचा इतिहास.

21

# भारतातील भुमीहीन मजुरांच्या समस्या व उपाय

प्रा. डॉ. बी. आर. शिंदे
वाणिज्य विभाग,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि. परभणी

***********

सारांश :–

भारत हा कृषीप्रधान देश आहे तरी पण भारतात भुमिहीन मजुराची संख्या लक्षणीय असून त्याच्या समस्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आहेत. हे सर्व मजुर ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्याच्यामुळे ग्रामीण जिवनात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या स्वतंत्र्य काळापासून आहेत. तेव्हा पासून त्याच्या समस्या कडे दुर्लक्ष झाल्याने त्यांच्या समस्या जास्तीच्या तीव्र झाल्या त्यावर प्रतीक्रीया देताना भारताचे माजी राष्ट्रपती श्री. संजीव रेडडी यांच्या मते, भारतातील भुमीहिन मजुराची समस्या हा एक धसमसनारा ज्वालामुखी असून तो केव्हाही जागृत होवून लाटा फेकू शकतो अशा गंभीर समस्यांकडे भारत सरकारचे दुर्लक्ष केले आहे. भारतात दुस–याच शेतजमीनीवर काम करणारे शेतमजुर तसेच शेतीशी सुंबंधित व्यावसायात काम करणा–या मजुरांचा भुमिहीन मजुरां मध्ये समावेश होतो. भुमिहीन मजूर हे शेतमजुर तसेच शेतीशी संबंधीत व्यावसायात काम करणा–या मजुरांचा भुमिहीन मजुरांमध्ये समावेश होतो. भुमीहिन मजूर हे शेतमजूर आहे किंवा नाही. हे पाहण्यासाठी खालील मुदद्े अभ्यासले जातात.

१. दुस–याच्या शेतीवर काम करून उपजीवीका भागवत असल्यास

२.ज्या जमीनीवर ते काम करतात त्यावर त्यांचा हक्क नसने

३. शेती व्यवसायावर मोबदल्यावर काम करणे



...peth ...n-431516 ...peth Dist.Parbhani

CamScanner

परंतू शेतीव्यावसायातील जोखीम न स्विकारणे.

जी व्यक्ती वरील मुदयास पात्र असते त्या व्यक्तीला शेतमजुर असे म्हणतात.

**भारतातील शेतमजुरांचीसंख्या :–**

भारतातील शेतमजुर संख्येचा अभ्यास करताना देशातील लोकसंख्या, देशातील लोकसंख्या वाढीचा दर, देशातील शेतीवर अवलंबून असलेली संख्या देशाची आर्थिक सुधारणा, ग्रामीण भागातील रोजगारांच्या संधी, शहरीकरण शिक्षणाचे प्रमाण यावर देशातील शेतमजुरांची संख्या अवलंबून असते. स्वातंत्रयापूर्व काळात भारतात शेत मजुरांची संख्या फारच कमी होती. शेतमजुरांबाबत बोलतांना सर थॉमस मन्रो असे म्हणतात १९४२ मध्ये भारतात शेतमजुरांचे प्रमाण फारच कमी होते. परंतु इ.स. १९८१ च्या जनगणनेनूसार भारतात भुमिहीन शेतमजुर ७.५ दशलक्ष होते. तर १९२१ मध्ये ही संख्या २१ द.ल. झाली. १९५१ मध्ये २७.५ द.ल. तर १९६१ मध्ये ३१.५ द.ल. भूमीहीन शेतमजूर भारतात होते. १९७१ च्या जनगणनेनुसार भारतात शेतमजुर ४७.५ द.ल. होते. तर १९८१ मध्ये ती संख्या ५५.४ दशलक्ष एवढी झाली. तर २००१ मध्ये ती संख्या १०७ द.ल. कोटी एवढी झाली.

वरील आकडेवारीवरून आपणास असे स्पष्ट करता येते की भारतात भुमीहीन शेतमजुरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. १९८१ ते २००१ या काळात भारतात भुमीहीन शेतमजूराच्या संख्येत ५० द.ल. एवढी वाढ झाली. परंतू हा काही भारताच्या दृष्टीने महत्वाचा होता. कारण त्या काळाला हरीत क्रांतीचा काळ म्हणून ओळखला जातो म्हणजेच एका बाजूला भारतात उत्पादनात वाढ होताना दिसते तर दुस–या बाजुला भुमीहीन मजुरांच्या संख्येत वाढ झालेली दिसते. त्यामुळे भारतात भुमीहीन मजुरांच्या प्रश्न जटील बनत गेला. त्यातून त्याच्या समस्या वाढत गेल्या त्या समस्या खालील प्रमाणे आपणास सांगता येतील.

**शेतमजुरांच्या समस्या :–**

भारतात सामाजीक आणि आर्थिक अशा अनेक कारणांमुळे शेतमजुरांची संख्या सतत वाढत आहे. आणि त्यांची आर्थिक स्थिती सातत्याने खलावत आहे. भारताला स्वातंत्रय मिळून ६५–६६ वर्षे झाली असली तरी आजही भारतातील शेत मजुरांच्या समस्या सुटल्या नाहीत ते भांडवलदाराकडे गुलामांसारखे राहून जीवन जगतात यावरून भारतीय शेतमजुराच्या समस्या अभ्यासता येतील.

**१.समाजात शेतमजुरांना कमी प्रतिष्ठा :–**

भारतात शेतमजुर शेती मालकाकडे शेतीची कामे करतात. ती सर्व कामे अंग मेहणतीची असतात. व्यवस्थापकीय शास्त्राच्या नियमानुसार जे लोक श्रम करतात त्यांचे आर्थिक उत्पादन कमी असते. ज्याचे आर्थिक उत्पन्न कमी असते त्यांना समाजात प्रतिष्ठा कमी असते. भारतात ग्रामीण भागात आज ही ज्या व्यक्तीकडे जमीनीची मालकी आहे अशांना प्रतिष्ठा मिळते म्हणून प्रत्येक व्यक्ती जमीनीचा मालकी हक्क मिळवीण्याचा प्रयत्न करतात.

**२. भारतीय शेतमजुरांचा मजुरीचा दर अत्यल्प:–**

इतर क्षेत्रापेक्षा शेतीतील मजुरांचा दर कमी आहेत. त्यांची आर्थिक आणि शारिरीक पिळवणूक ही होत त्यामुळे त्यांचे आर्थिक उत्पन्न कमी होते. त्यामुळे त्यांच्या आर्थिक जीवन स्तर खलावतो. भारतातील शेतमजुरांचे मजुरीचे दर कमी असण्याचे कारण म्हणजे भारतीय शेतीची असलेली कमी उत्पादकता याचाच अर्थ भारतीय शेतकरी सुध्दा गरीब असतो. जास्त पैसे मजुरांना देवून काम करून घेण्याची त्याची ऐपत नसते. मजुरांचे शिक्षणाचे प्रमाण कमी त्यामुळे त्यांच्यात मोठया प्रमाणात अज्ञान असते.

**३. अनियमित रोजगार :–**

भारतातील ग्रामीण भागातील भुमीहीन मजुरांना वर्षातील काही दिवस रोजगार मिळतो. नियमित रोजगार मिळत नाही शेतमजुर चौकशी समीतीच्या अहवालानुसार भारतात पुरूषाला २०० दिवस तर स्त्री मजुराना १४१ दिवस वर्षात काम मिळते. म्हणजे भारतात भुमीहीन शेतक–याला हंगामी रोजगार मिळतो इतर दिवसात तो बेरोजगार असतात त्याचा परिणाम त्याच्या आर्थिक उत्पन्नावर होतो.

**४. भुमीहीन शेतमजुरांचे मोठया प्रमाणावर स्थलांतर:–**

Late R... Sonpeth Pin 431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

भारतातील भुमीहीन शेतक—यांना ग्रामीण भागात स्थिर रोजगार मिळत नाही तर त्यांना रोजगार मिळविण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी जावे लागते. हंगामात ग्रामीण रोजगार तर हंगाम संपल्यानंतर ग्रामीण भुमीहीन शेतकरी शहराकडे जातात. शेतमजुरांना ग्रामीण भागात ४ महीने रोजगार मिळतो तर शहरी भागात ८ महीने रोजगार मिळतो अशा स्थितीत तो ग्रमीण भागात स्थायिक होत नाही शहरात सुध्दा स्थिर होत नाही.

**५. अनिश्चित जीवन पध्दती :—**

भूमीहीन शेतक—यांना निश्चित स्वरूपाचा रोजगार मिळत नसल्यामुळे त्याची जिवन जगण्याची पध्दत शुध्द अनिश्चित असते. ते सरासरी १२० दिवस ग्रामीण भागात तर ३४० दिवस शहरी भागात राहतात. अशा रितीने त्यांच्या जीवनात अनिश्चित असतात. ते स्थिर होत नाहीत. त्याचा परिणाम त्यांच्या मुलांना शिक्षण सुध्दा घेता येत नाही. त्यामुळे त्यांच्या अज्ञान आणि अशिक्षितपणा वाढतो. भारतात शेत मजुरांची संख्या जवळपास ५५ ते ६० द.ल. आहे. यातील बहुतांश शेतमजुर अज्ञानी व अशिक्षित आहेत. ते पारंपारीक पध्दतीने जीवन जगतात. त्यांच्याकडे पैसा नसतो. तुटपुंजा पैसा येतो. त्यातील बराच पैसा धर्म आणि परंपरेवर खर्च करतात. त्यामुळे ते आर्थिक सबल असलेल्या व्यक्तीकडे ते गुलाम म्हणून काम करतात. हेच लोक त्यांचा स्वार्थपुर्ण करण्यासाठी त्यांना मजुरीच्या रूपाने मिळणारा मोबदला कमीत कमी देतात व समाजातील सबळ घटक त्यांची पिळवणूक करतात. त्यामुळे ते लोक आपल्या गरजा उदा. लग्न, दवाखाना, पुर्ण करण्यासाठी कर्ज काढावे लागते. आज भारतातील शेतमजुरापैकी बहुतांश शेतमजुर कर्जबाजारी आहेत. ते कर्जात जन्मतात, कर्जात वावरतात आणि कर्जातच मरतात अशी स्थिती त्यांची बनते. आवश्यक गरजा सुध्दा पूर्ण करू शकत नाहीत त्यामुळे ते संघटीत होउन आपल्या समस्या मांडू शकत नाहीत. कारण ते विखुरलेले असतात. अशिक्षित असतात. अज्ञानी असतात त्यामुळे ते संघटीत होत नाहीत व आपल्या मागण्या मान्य करण्यात किंवा पूर्ण करण्यात किंवा पूर्ण करून घेण्यास कमी पडतात. म्हणून त्यांच्या समस्या वाढत जातात. शेतमजुराच्या समस्या वाढत गेल्या तरी अनेक वेळा उपाय योजना केल्या आहेत. त्या उपाययोजना खालील प्रमाणे आभ्यासता येतील.

**भूमीहीन शेतमजुरांच्या समस्येवरील उपाय योजना :—**

भारतात शेतमजुरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यांची सामाजीक आणि आर्थिक स्थिती सातत्याने खालावत आहे देशाला स्वतंत्र्य मिळून ६५—६६ वर्षे होवून सुध्दा भारतातील भूमीहीन शेतमजुराच्या सामाजीक आणि आर्थिक संपलेल्या नाहीत त्यासाठी भारत सरकारने अनेक वेळा वेगवेगळया समित्या नियुक्त करून उपाययोजना केलेल्या आहेत. त्या उपाययोजना आभ्यासता येतील..

१. इ.स १९७४ मध्ये भारत सरकारणे शेतमजुरांच्या जास्तीत जास्त मजुरीसाठी उपाययोजना केली भारतात जम्मु—काश्मिर, नागालॅंड, आणि सिक्कीत टी राज्य सोडून इतर सर्व राज्यामध्ये मंजुरांच्या मजुरीचे जास्तीत जास्त दर ठरविण्यात आले आहेत.

२. भूमीहीन शेतकरी त्यांच्या दारिद्रयामुळे त्यांच्या आवश्यक गरजा पुर्ण करण्यासाठी सावकारांडून कर्ज घेतात परंतु अपुरे आणि अनियमित उत्पन्न असल्यामुळे कर्जाची परतफेड वेळेवर करू षकत नाहीत. अशा प्रकारच्या मजुराना सावकांराचे कर्ज फिटे पर्यंत कामाचा मोबदला न देता कर्ज रूपाने दिलेल्या पैशात काम करून घेतात. अशा शेतमजुराना वेटबिगार असे म्हणतात. अषा वेटबिगार कामगारांना सावकाराच्या तावडीतून बाहेर काढयासाठी व वेठबिगार पध्दत नष्ट करण्यासाठी ऑक्टोंबर १९७५ मध्ये हा कायदा संबंधी अधिसुचना काढण्यात आली व १९७६ ला हा कायदा संमत करण्यात आला. या कायदया मुळे १९८६ पर्यंत देशात २५,९२३ वेठबिगार शेतमजुर बेठबिगारतून मुक्त करण्यात आले.

३. भुमीहीन शेतक—यांना नियमित रोजगार मिळावा म्हणून भारत सरकारणे व राज्य सरकाने रोजगार निर्मिती करण्यासाठी उपाय—योजना म्हणून विशेष कार्यक्रमाची आखणी केली त्यात ग्रामीण प्रकल्प कार्यकम, ग्रामीण रोजगार धडक योजना, कामाच्या मोबदल्यात अन्न अशा अनेक योजना भारत सरकारने उपाययोजना म्हणून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी

निर्माण केल्या.

४. भुमीहीन शेतक–यासाठी भारत सरकारने कमाल जमीन धारणा कायदा लागू करून भारतातील प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट मर्यादे पर्यंत जीमीन आपल्या मालकीची ठवता येईल असे जाहीर केले. त्यामुळे मोठया शेतक–याकडून सरकारला मोठया प्रमाणात जमीन मिळाली त्या जमीन भुमीहीन शेतक–यामध्ये वाटप कराव्यात अशा निर्णय भारत सरकारने १९५७ मध्ये घेतला व ७० लाख हेक्टर जमीन भुमीहीन शेतक–याना वितरीत करण्यात आल्या.

५. ग्रामीण भागातील भूमीहीन शेतमजुर स्थिर व्हावेत म्हणन त्यांना घर बांधण्यासाठी जागा देण्याबाबत भारत सरकारने कायदे करण्यात आले आहेत त्यांना बरोबर योजना राबवीण्यात येत आहेत.

भारत सरकारणी भूमीहीन शेतक–यासाठी वरिल प्रकारच्या उपाय योजना केल्या तरी भारतातील भूमीहीन शेतक–याच्या समस्या मिटल्या नाहीत. सरकारचे सर्व प्रयत्न अपुरे पडलेले दिसतात कारण भूमीहिन शेतक–यांना जमीन दिली परंतु जमीन कसण्यासाठी व लागवडीसाठी लागणारी साधनसामग्री त्या शेतमजुराकडे उपलब्ध नाही त्यामुळे मिळालेली जमीन लागवडीखाली आली नाही भारत सरकारणे वेगवेगळया रोजगार निर्मितीसाठी कार्यक्रम राबवून सुध्दा ते पुर्ण झाले नाहीत. त्यामुळे आजही शेतमजुर गुलामासारखे जीवन जगतात त्यासाठी योग्य त्या उपाययोजना भारत व राज्य सरकारने करणे आवश्यक आहे.

संदर्भ:–

१. डॉ. मेघा कानेटकर – भारतीय अर्थशास्त्र

२. प्रा.डॉ. दत्तात्रय भुमेकर– महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

३. डॉ. डी.आर. जगनाथ/वाणी/– भारतीय अर्थव्यवस्था जंगले/ पाटील एक दृष्टीक्षेप

PRINCIPAL
Late Ramesh W... ...kar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



CamScanner